महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, -Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र.मुंविमं/भांडार/इ.१०वी/१२वी/लेखन साहित्य/२८४६
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.
दिनांक : ४ / २ /२०२२.

प्रति,

केंद्रसंचालक,
केंद्र क्रमांक --------------केंद्राचे नांव ---------------

विषय : मार्च/एप्रिल २०२२ उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांसाठी लेखनसाहित्य वितरणाबाबत सूचना.

उपरोल्लेखित विषयाचे संदर्भात आपणांस कळविण्यात येते की, मार्च/एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात येणा-या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) च्या लेखी परीक्षेसाठी आवश्यक उत्तरपत्रिका , पुरवण्या व इतर लेखन साहित्य याचे वितरण जिल्हानिहाय रायगड, पालघर, ठाणे व मुंबई या क्रमाने करण्यात येणार आहे. सर्व केंद्रसंचालकांना कळविण्यात येते की, आपल्या केंदावरील मार्च २०२१ इ. १०वी /इ. १२वी परीक्षासाठी वितरीत करण्यात आलेले लेखन साहित्य वापरण्यात यावे. ज्या केंद्रावर लेखन साहित्य उपलब्ध नसेल अशा केंद्रावर लेखन साहित्य पाठविण्यात येत आहे, ते प्रथम स्विकारण्यात यावे. **अपवादात्मक परिस्थितीत केंद्र स्थळामध्ये बदल झाल्यास आपण स्विकारलेले साहित्य बदल झालेल्या केंद्रावर घेवून जाणेबाबत संबंधित केंद्रास कळविण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत लेखन साहित्य नाकारण्यात येवू नये.**

इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य उत्तरपत्रिका व पुरवणी यांचे वितरण खालील सुचनेनुसार करण्यात यावे.

| अ. क्र. | उत्तरपत्रिकेचा प्रकार | कोणत्या शाखेसाठी | कोणत्या विषयासाठी | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १. | २८पानी उत्तरपत्रिका | सर्व शाखांसाठी (सायन्स/ एमसीव्हीसी/आर्टस/कॉमर्स) | सर्व विषयांसाठी | प्रत्येकी एक. |
| | | | गणित(८८) | प्रत्येकी दोन |
| २ | ०४ पानी पुरवणी | सायन्स/आर्टस/कॉमर्स/ एमसीव्हीसी | सर्व विषयांसाठी | आवश्यकते नुसार |
| ३. | लॉगटेबल | विज्ञान / वाणिज्य व कला | भौतिकशास्त्र | प्रती विद्यार्थी एक (लेखी परीक्षेसाठी) |
| | | | गणित (४०) व (८८) | दोन विद्यार्थ्यास एक (लेखी परीक्षेसाठी) |
| ४. | नकाशा पुरवणी | कला/वाणिज्य/विज्ञान | फक्त भुगोल विषयाच्या लेखी परीक्षेसाठी वापरण्यात यावी | प्रती विद्यार्थी एक |

2022

गणित/भौतिकशास्त्र या विषयांच्या लेखी परीक्षेसाठी लॉग टेबल देण्यात यावे. मंडळातर्फे पाठविलेल्या लॉग टेबलची संख्या विचारात घेऊन (अतिरिक्त लॉगटेबल मंडळात उपलब्ध नाहीत) याची नोंद घेऊन दिलेल्या सुचनेप्रमाणे वाटप करण्यात यावे. भौतिकशास्त्र (५४) प्रती विद्यार्थी ०१ (२५ विद्यार्थ्यांना २५) व गणित (४० व ८८) दोन विद्यार्थीना ०१ (२५ विद्यार्थ्यांना १५) या प्रमाणात लॉगटेबल पुरविण्यात आलेले आहेत. परीक्षा संपल्यावर लॉगटेबल मंडळास परत करण्याची जबाबदारी केंद्रसंचालकांची राहील. यापूर्वीचे मंडळाचे लॉगटेबल आपल्याकडे शिल्लक असल्यास त्याची नोंद मंडळास कळविण्यात यावी.

१. मार्च/एप्रिल -२०२२ च्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांसाठी आवश्यक २८ पानी / २० पानी उत्तरपत्रिका, तसेच ०४ पानी पुरवणी, नकाशा पुरवणी, लॉग टेबल, ड्रॉईंगशीट इत्यादी लेखन साहित्य केंद्रावर प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेवून Appendix "A" नुसार पाठविण्यात येत आहेत.

२. मंडळाकडून पाठविण्यात येणारी स्टेशनरी विद्यार्थी संख्येनुसार सोबत जोडलेल्या Appendix "A" नुसार बरोबर आहे किंवा नाही हे तपासून घ्यावे उपरोक्त सर्व संदर्भ लक्षात घेऊन परीक्षा केंद्रावर लेखन साहित्य वाटपाचे नियोजन योग्य प्रकारे करावे.

३. उत्तरपत्रिकेची शिलाई व आतील सर्व पाने व्यवस्थित असल्याबाबत खात्री करूनच विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप करण्यात यावे.

४. आपले केंद्रातून प्रत्येक विषयास प्रविष्ठ होणा-या विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन अचूकरित्या उत्तरपत्रिका व पुरवण्या पाठविण्यात येत आहेत.

५. विद्यार्थ्यांना २८ पानी / २० पानी उत्तरपत्रिका दिल्यावर पुरवण्यांची आवश्यकता भासणार नाही. परंतू काही विद्यार्थ्यांनी पुरवण्यांची मागणी केली तर संबंधित विद्यार्थ्यांनी मुळ उत्तरपत्रिकेतील सर्व पृष्ठांचा वापर केला आहे याची खात्री करुन घेतल्यावरच विद्यार्थ्यांना पुरवण्या देण्याबाबतची सूचना सर्व संबंधित पर्यवेक्षकांना देण्यात यावी.

६. **आपणांस देण्यात आलेले साहित्य हे पुरेशा प्रमाणात देण्यात आलेले आहे. तथापि साहित्य कमी पडणार असेल तर मंडळाकडे मागणी करताना पुढील प्रमाणे कार्यवाही करावी.** केंद्रावर असलेली विद्यार्थी संख्या, मंडळातर्फे पुरविण्यात आलेले साहित्य, आपणास कमी पडणारे लेखन साहित्य याची आज अखेर तपशीलवार नोंद केलेल्या प्रपत्राची छायांकित प्रत घेवून अधिकार पत्रासह आपला प्रतिनिधी प्रथम आपल्या परीक्षा केंद्राच्या अंतर्गत येणा-या परिरक्षण केंद्रावर पाठवावा. त्यांच्याकडे ठेवण्यात आलेल्या राखीव साठ्या मधून साहित्य उपलब्ध करून घेण्यात यावे. परिरक्षण केंद्रावर पुरेसे साहित्य उपलब्ध न झाल्यास वाशी येथील मंडळ कार्यालयात प्रतिनिधी पाठवून आवश्यक साहित्य ताब्यात घेण्याची व्यवस्था करण्यात यावी.

७. **परीक्षा सुरू झाल्यावर केंद्रावरील विषयनिहाय विद्यार्थी संख्या विचारात न घेता काही केंद्रे अनावश्यक जादा स्टेशनरीची मागणी मंडळाकडे करतात त्यामुळे परीक्षेनंतर मोठया प्रमाणात स्टेशनरी परीक्षा केंद्रांवरून परत येत असल्याचे मंडळाचे निदर्शनास आलेले आहे. तरी पुरविण्यात आलेल्या स्टेशनरीचा योग्य प्रकारे व आवश्यक तेवढा वापर करण्यात यावा व अनावश्यक मागणी करू नये.**

विशेष सुचना :-

१. इ.१२ वी /इ. १० वी साठी मंडळाने पुरवठा केलेल्या नकाशा पुरवणीचेच वाटप करावे. जुन्या नकाशा पुरवणीचे वाटप करू नये.

२. सन २०१८-१९ पूर्वीच्या बारकोड नसलेल्या, जुन्या उत्तरपत्रिका / जुन्या पुरवण्या आपले केंद्रावर शिल्लक असतील, तर त्या कोणत्याही परिस्थितीत विद्यार्थ्यांना दिल्या जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी व असतील तर त्या मंडळात आणून जमा कराव्यात किंवा शिल्लक नसतील तर आपल्या केंद्रावर अशा प्रकारच्या जुन्या उत्तरपत्रिका/ जुन्या पुरवणी इ. लेखन साहित्य शिल्लक नसल्याबाबतचे प्रमाणपत्र केंद्र संचालक सभेस येताना घेवून यावे.

३. परीक्षेचा शेवटचा पेपर झाल्यावर आपल्या केंद्रावरील शिल्लक लेखन साहित्य (उत्तरपत्रिका, पुरवण्या, नकाशा, आलेख, लॉगटेबल, ड्रॉईंगशीट इ.) त्याच दिवशी आपल्या परीक्षा केंद्राच्या अंतर्गत परिरक्षण केंद्रावर FORM "A" मध्ये नमूद करून जमा करण्यात यावे व त्याची पोहोच घेण्यात यावी. व सदर पोहोच ची एक छायांकित प्रत मंडळ कार्यालयात भांडार शाखा खोली क्र.१०२ मध्ये जमा करावी.

विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवीमुंबई-४०० ७०३.